# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## समाज कल्याण विभाग

### जाहिर आवाहन

नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. संकिर्ण-२००५/प्र.क्र.२५५/०५/नवि-२०, दिनांक ८ नोव्हेंबर, २०१० व शासन निर्णय क्रमांक-एमयुएम-२०२१/प्र.क्र.३८५/नवि-१७ दिनांक २९ मार्च, २०२२ तसेच मा. प्रशासकिय ठराव क्रमांक - ५४, दिनांक - १४/११/२०२२ नुसार सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात समाज कल्याण विभागा अंतर्गत महिला व बाल निधीतून भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मुली/महिलांना लाभ देणेकामी खालिलप्रमाणे लाभार्थी संख्या निश्चीत करण्यात आली आहे.

| अ.क्र. | योजनेचे नाव | लाभाचे स्वरुप | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | मुली व महिलांना स्पर्धा परिक्षेसाठी अर्थसहाय्य देणे. (युपीएससी/एमपीएससी/स्टाफ सिलेक्शन/बॅकींग) | रु. ५,०००/- प्रती लाभार्थी | ५ |
| २ | मुली व महिला खेळाडुंकरीता (जिल्हास्तर/राज्यस्तर/राष्ट्रीयस्तर/आंतरराष्ट्रीयस्तर खेळासाठी) गुणवत्ता प्राप्त खेळाडुकरीता शिष्यवृत्ती देणे. | जिल्हास्तर खेळाडु - २,०००/-<br>राज्यस्तर खेळाडू - ३,०००/-<br>राष्ट्रीयस्तर खेळाडू - ४,०००/-<br>आंतरराष्ट्रीयस्तर खेळाडु - ५,०००/- | २<br>२<br>२<br>२ |
| ३ | कोविड विषाणु प्रादुर्भावामुळे एक/दोन्ही पालक गमावलेल्या अनाथ बालकांकरीता विशेष सहाय्य उपाययोजना करणे. | रु. ५,०००/- प्रती लाभार्थी | ४५ |
| ४ | विधवा/निराधार महिलांच्या मुलींच्या विवाहाकरीता अर्थसहाय्य देणे. | रु. १०,०००/- प्रती लाभार्थी | २० |

वरील योजनांकरीता नमुना अर्ज महानगरपालिकेच्या **bncmc.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत. आवश्यक माहितीसाठी महानगरपालिका समाज कल्याण विभाग येथे संपर्क साधून आपले अर्ज सादर करावे.

वरील सर्व वैयक्तीक योजनांकरीता प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य याप्रमाणे दि.३१/१२/२०२२ रोजीपर्यंत लाभार्थ्यांचे अर्ज स्विकारण्यात येतील. तसेच तत्पूर्वी लाभार्थी संख्येचे उदीष्ट पुर्ण झाल्यास सदर योजनेचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी असे महानगरपालिकेच्या वतीने आवाहन करणेत येत आहे.

उपआयुक्त (समाज कल्याण)
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका